# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 25/01/2024 (गुरूवार) सकाळ

### महिला सक्षमीकरण कार्यक्रम तसेच महिला बाल कल्याण विभाग जिल्हा परीषद नागपूरचे वतीने राष्ट्रीय बालिका दिवस अंतर्गत बेटी बचाव बेटी पढाओ कार्यक्रम आयोजित

नगर पंचायत मौदा तर्फे शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार दिनांक २४/०१/२०२४ रोजी संताजी भवन मौदा येथे दुपारी १२.०० वाजता **महिला सक्षमीकरण कार्यक्रम** जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. सायबर विभागातर्फे महिलांना Cyber Crime या विषयावर जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात आले.

तसेच महिला बाल कल्याण विभाग जिल्हा परीषद नागपूरचे वतीने राष्ट्रीय बालिका दिवस अंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह कामठी रोड नागपूर येथे **बेटी बचाव बेटी पढाओ** कार्यक्रम आयोजित करण्यात आला. सदर कार्यक्रमात सायबर पोलीस स्टेशन नागपूर ग्रामीण यांनी Cyber Crime या विषयावर जनजागृतीपर कार्यक्रम घेतला.

सदर कार्यक्रमास पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे, महिला पोलीस हवालदार स्नेहलता ढवळे, वर्षा खंडाईत, पोलीस नायक सतिश राठोड, संगीता गावंडे, ममता सरोदे, पोलीस अंमलदार मृणाल राऊत व मनीष नेवारे सायबर सेल नागपूर ग्रामीण उपस्थित होते.






बेटी बचाओ - बेटी पढाओ
दिनांक- २४ जानेवारी २०२४
दिवस अंतर्गत जिल्हास्तरीय
व बालकल्याण विभाग,
परिषद, नागपूर सन २०२३-



## दिनांक २६/०१/२०२४ ते रात्री ००.०० वा. पासुन ते २४.०० वाजता पर्यंत

## जड अवजड वाहतूक वळविणेबाबत सुचना

दिनांक २६/०१/२०२४ रोजी पोलीस स्टेशन मौदा नागपूर ग्रामीण हद्दीतील पावडदौना शिवारात राष्ट्रीय महामार्ग ५३ लगत परमात्मा एक सेवकांचा मेळावा आयोजीत असुन सदर मेळाव्यात दरवर्षी ०९ ते १० लाख सेवक प्रार्थना स्थळाला भेट देतात. सदरचे प्रार्थना स्थळ हे राष्ट्रीय माहामार्ग कमांक ५३ नागपूर ते भंडारा कडे जाणाऱ्या मार्ग लगत पावडदौना येथे असुन त्या मार्गावर दिवस रात्र मोठ्या प्रमाणात वाहतुकीची वर्दळ असते.

सदर कार्यक्रमात सेवकांना व सर्वसामान्य लोकांना जाणे– येण्यास वाहतुकीच्या दृष्टीने अडचण होवु नये, तसेच गर्दी मुळे एखादी अप्रिय घटना घडु नये म्हणून कार्यक्रम कालावधीत जड अवजड वाहनांना प्रवेश बंदी करणे करीता मा. पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार यांच्या विनंतीवरून पोलीस आयुक्त नागपूर शहर व जिल्हाधिकारी भंडारा यांनी अधिसूचना काढली असुन नागपूर ते मौदा कडे जाणारी तसेच भंडारा ते नागपूर कडे येणारे सर्व प्रकारची जड अवजड वाहतुक वळविले असुन दिनांक २५/०१/२०२४ रोजी २४.०० वाजता दिनांक २६/०१/२०२४ ते २४.०० वाजता पर्यंत अंमलात राहील. याबाबत बदललेला मार्ग खालीलप्रमाणे –

१) नागपूर ते मौदा, भंडारा, तिरोडा, गोंदीया कडे जाणारी सर्व जड अवजड वाहतुक कापसी पुलीया येथुन मनसर –रामटेक–घोटीटोक–महादुला–सालई जाम–खापा–मोहाडी–वरठी–भंडारा मार्गाने वळविण्यात येईल.

२) साकोली, लाखनी भंडारा येथुन नागपूर कडे येणारे जड अवजड वाहतूक लाखनी –केसलवाडा–अडयाळ–पवनी–भिवापूर–उमरेड– नागपूर मार्गाने वळविण्यात येईल.

तरी वरील सूचनाचे पालन करून पोलीस विभागास सहकार्य करावे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**